मुक्तागिरी

# म.सा.प.चा पद्मश्री नामदेव ढसाळ काव्यप्रतिभा पुरस्कार डॉ.सुभाष वाघमारे यांना जाहीर

## संविधानाच्या स्वप्नातलं गाव' कवितासंग्रहास प्रथम क्रमांक




**सातारा** : येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे घटक महाविद्यालय असलेल्या, रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुभाष वाघमारे यांच्या 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव' या कवितासंग्रहास महाराष्ट्र साहित्य परिषद राजगुरूनगर या संस्थेने प्रथम क्रमांक जाहीर करत पद्मश्री नामदेव ढसाळ काव्यप्रतिभा पुरस्कार २८ जानेवारी २०२३ रोजी जाहीर केला आहे. परिषदेकडे आलेल्या ७० कवितासंग्रहात 'संविधानाच्या स्वप्नातल गाव ' कवितासंग्रहाने प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय क्रमांक प्रा. लक्ष्मण महाडिक यांच्या 'स्त्री कुसाच्या कविता' या संग्रहास, संदीप धावडे यांच्या' परिवलन परिभ्रमण' या कविता संग्रहास तृतीय क्रमांक, उत्तम सावंत यांच्या 'कुरकुल 'कविता संग्रहास चौथा तर सौ.माधुरी विधाटे यांच्या 'मल्हारधून' कवितासंग्रहास पाचवा क्रमांक मिळाला आहे. सदर पुरस्कारांचे वितरण रविवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२३ रोजी पंचायत समिती राजगुरुनगर ता.खेड. जिल्हा पुणे येथे केले जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या राजगुरूनगर शाखेचे अध्यक्ष मा.संतोष गाढवे यांनी दिली. २०२१ चे पुरस्कार कोरोना अभावी जाहीर करण्यात आले नव्हते.

प्रा.डॉ.सुभाष वाघमारे हे मूळ,मळोली. ता.माळशिरस.जि.सोलापूर गावचे असून 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव' हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह असून महाराष्ट्रातील नामांकित १५ पुरस्कार या कवितासंग्रहाने मिळविल्याबद्दल रयत शिक्षण संस्था तसेच विविध विद्यापीठातील प्राध्यापक विद्यार्थी व महाराष्ट्रातील पुरोगामी वर्तुळातून प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. अलीकडेच ५ जून २०२१ रोजी त्यांच्या संविधानाच्या स्वप्नातलं गाव या कवितासंग्रहाचे प्रकाशन ८९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस व रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर यांच्या हस्ते झाले होते.

या कविता संग्रहास वाचन संस्कृती प्रतिष्ठान श्रीरामपूरचा राज्यस्तरीय समाज प्रबोधन पुरस्कार,छत्रपती शिवाजी कॉलेजचा सर्जनशील साहित्य लेखन पुरस्कार,तसेच गारगोटी येथील न्यूज पेपर गंगाधर पुरस्कार, तसेच तरवडी येथील सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कार, शब्दकळा साहित्य संघ मंगळवेढा यांचा काव्य पुरस्कार,श्रीरामपूर येथील प्रकाश किरण पुरस्कार, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचा ललित साहित्य पुरस्कार, फलटण येथील उत्कृष्ट साहित्यसेवा पुरस्कार,सृष्टी साहित्य पुरस्कार अकोला ,वामनदादा कर्डक राष्ट्रीय पुरस्कार, पुणे येथील स्वातंत्र्यसैनिक आबक पुरस्कार, सातारा येथील अक्षर गौरव साहित्य प्रेरणा पुरस्कार,दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा विशेष पुरस्कार,कोपरगाव येथील भि.ग.रोहमारे पुरस्कार इत्यादी पुरस्कार मिळाले. साहित्यविश्व प्रकाशनचे प्रकाशक विक्रम शिंदे,डॉ.संजयकुमार सरगडे,तारुण्यवेध संघटनेचे विशाल पोखरकर,छत्रपती शिवाजी कॉलेजचा स्टाफ,समता प्रतिष्ठान सेवाभावी संस्थेचे कार्यकर्ते,भीमराव मोरे,तुकाराम लोखंडे, शिवाजी वाघमारे, डॉ.गोरख बनसोडे, फर्ग्युसन कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.प्रकाश पवार, 'भिनवाडा' कादंबरीचे लेखक बाळासाहेब कांबळे, प्रा.युवराज खरात,तुषार बोकेफोडे, प्रा.डॉ.आर.ए.कुंभार सम्यक शाक्यरत्न,मळोली,सातारयातील विचारवंत किशोर बेडकिहाळ, अश्वमेध ग्रंथालयाचे अध्यक्ष रविंद्र भारती झुटिंग,डॉ. राजेंद्र माने,मळवली गावातील हितचिंतक ग्रामस्थ,महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्यकर्ते,लुंबिनी संघ सातारा, छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील माजी विद्यार्थी संघ ,शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर,शिक्षक हितकारणी संघटना पुणे,तसेच अनेक साहित्यिक इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले.आहे.


emuktagiri.in
powered by thoughtpad infotech